# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील बहुतांश शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर यांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याबाबत

**(१) ४६७ (२४-०४-२०२५) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश शासकीय व अशासकीय शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर यांची पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्याने निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी, २०२५ अखेर शासकीय व अशासकीय शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर रिक्त पदांची जिल्हानिहाय संख्या किती आहे,

(३) असल्यास, शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-०२-२०२६) :** (१), (२) व (३) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ च्या आधारे पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात मुलाखतीसह व मुलाखतीशिवाय अशी एकूण ३२,०१७ पदांची जाहीरात प्रसिध्द झाली. त्यानुसार २३,८७१ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये खंड पडू नये यास्तव शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ घेण्यात आली असून, त्याचा निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार शिक्षक भरतीबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यास्तव रिक्त शिक्षक पदे भरणेबाबत शासन प्रयत्नशील आहे.

मा.न्यायालयाने शिक्षकेतर कर्मचारी यांचे आकृतीबंधास स्थगिती दिल्याने पदे भरण्यात येत नव्हती. सदरची स्थगिती उठली असून, सदरची पदे भरण्याचा मार्ग उपलब्ध झालेला आहे. तसेच शिक्षकेतर

कर्मचारी यांची पदे काही अटींच्या अधिन राहून १०० टक्के पदे सरळसेवेने भरण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचेकडून दिनांक २८/०५/२०२५ च्या पत्रान्वये सन २०२४-२५ ची संचमान्यता पूर्ण झाल्यावर करावयाच्या शिक्षकेतर कर्मचारी पदभरतीबाबत आवश्यक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार या सूचनांबाबत यथोचित निर्णय होऊन सदरची पदे लवकरात लवकर भरण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांकडून प्रशिक्षणासाठी घेण्यात येणारे प्रशिक्षण शुल्क रद्द करण्याबाबत

**(२) २८०१ (१८-०७-२०२५) ॲड.अनिल परब, श्री.संजय केणेकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गृहनिर्माण संस्थांसाठी सहकार कायदयात विविध सुधारणा करताना संस्थेच्या सभासदांकडून तीन तासांचे प्रशिक्षण देण्यासाठी वर्षाला १२० रुपये तर संस्थेकडून एक हजार रुपयांचे शिक्षण प्रशिक्षण शुल्क सहकार विभागाकडून जमा केले जात असल्याचे माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,जिल्हा हौसिंग फेडरेशन तसेच कांही खाजगी प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून हे प्रशिक्षण दिले जाणार असून त्याकरीता १ लाख २० हजार गृह निर्माण संस्थामधील सुमारे ४ कोटी सभासदांकडून प्रशिक्षण शुल्क घेतले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहकारी संस्था आणि त्यातील सभासदाच्या माध्यमातून वर्षाला कोटयवधी रुपये गोळा करणारी ही तरतूद तात्काळ रद्द करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, व चौकशीच्या अनुषंगाने नागरिकांच्या मागणीनुसार गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांनी नि:शुल्क प्रशिक्षण देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री.बाबासाहेब पाटील (२४-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या प्रकरणाबाबत अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक १५/०४/२०२५ रोजी प्रारुप नियम प्रसिध्द केले आहेत. सहकार विभागाकडून शिक्षण प्रशिक्षण शुल्क जमा केले जात नाही.
(२) याबाबतचे नियम अंतिम करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(३) राज्यातील सहकारी संस्था व संस्थेचे सभासद यांच्या प्रशिक्षणाची तरतूद रद्द करणेबाबत मा.श्री.शंकर जगताप विधानसभा सदस्य (चिंचवड) व मा.श्री.हर्षवर्धन सपकाळ, अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, मुंबई यांचेकडून निवेदने प्राप्त झाली आहे.
(४) सन २०१९ मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनयम, १९६० मध्ये ‘सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी’ प्रकरण १३ब कलम १५४ब स्वतंत्रपणे समाविष्ट केले आहे. त्यामधील कलम १५४ ब-६ मध्ये सहकारी

गृहनिर्माण संस्थांच्या सदस्यांना सहकार विषयक शिक्षण व प्रशिक्षण देणेबाबतची तरतूद आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या प्रकरणाबाबत अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) नियम, २०२५ दिनांक १५/०४/२०२५ रोजी शासन राजपत्र प्रसिध्द केले आहे.

सदर प्रारुप नियमातील नियम क्रमांक १०६ सी-७ मध्ये गृहनिर्माण संस्थेचे सभासद,अधिकारी व कर्मचारी यांच्या साठी प्रशिक्षण व सहकार शिक्षण याबाबत पुढीलप्रमाणे तरतूद केली आहे.

१) प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संस्था, संस्थांचे संघटन किंवा सहकारी गृहनिर्माण संघटना यांचे सभासद, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी राज्य संघीय संस्था किंवा राज्यशिखर प्रशिक्षण संस्थेमार्फत वार्षिक शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करील.

२) सहकार शिक्षण व प्रशिक्षण निधीसाठी प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संस्था प्रत्येक सदस्यामागे दरमहा दहा रुपये तर प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संघटना किंवा संस्थांच्या संघटना याकरीता वार्षिक रुपये एक हजार इतके अंशदान देईल. अशा अंशदानाचे संकलन करण्यात येईल व त्याचा वापर दरवर्षी आर्थिक वर्षात किंवा पुढील वर्षी प्रशिक्षण कार्यक्रमासाठी करण्यात येईल.

३) शिक्षण प्रशिक्षण कालावधी शक्य होईल तेथवर

अ) सभासदांसाठी वर्षातुन तीन तासांचे किमान एक सत्र.

ब) समितीचे सभासद, पदाधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी वर्षातुन तीन तासांची किमान दोन सत्रे, इतके असेल.

४) राज्य शासनाने अधिसूचित केलेली राज्य संघीय संस्था किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था, संस्थांची संघटना किंवा सहकारी गृहनिर्माण संघटना यांचे सभासद, अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहकारी शिक्षण व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करेल.

महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) नियम, २०२५ अंतिम करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(५) निरंक

---

## वन विभागाकडे हस्तांतरीत केलेल्या खारफूटी क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन करण्याबाबत

**(३) ४७७२ (१४-१२-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बॉम्बे एन्व्हायर्नमेंटल ॲक्शन ग्रुप या स्वयंसेवी संस्थेने दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना मा.मुंबई उच्च न्यायालयाने खारफुटी नष्ट होण्याचे धोके लक्षात घेऊन खारफुटींना ‘संरक्षित वन’ म्हणून घोषित केले असून सरकारी संस्थांच्या ताब्यात असलेल्या खारफुटींच्या सर्व जमिनी वन विभागाकडे हस्तांतरित करून त्यांना जंगल म्हणून अधिसूचित करावे, असे आदेश माहे ऑक्टोबर २००५ मध्ये वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत २० वर्षात सिडको, एमएमआरडीए, जेएनपीटी, मीरा-भाईदर महानगरपालिका, महसूल विभाग इत्यादी सरकारी संस्थांनी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आपल्या ताब्यातील किती हेक्टर क्षेत्र वन विभागाकडे सोपविले आहे,

(३) असल्यास, वन विभागाच्या ताब्यात असलेल्या खारफूटी क्षेत्राच्या संरक्षण व संवर्धन करण्याकरीता

शासनाने कोणत्या उपाययोजना हाती घेतल्या वा घेण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२०-०२-२०२६) :** (१), (२) व (३) कांदळवन संरक्षण व संवर्धनाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाव्दारे दिनांक १७/०९/२०१८ च्या आदेशान्वये सर्व शासकीय यंत्रणांच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्रास ‘‘संरक्षित वन’’ म्हणून घोषित करुन वन विभागाकडे हस्तांतरीत करण्याचे आणि खाजगी मालकीच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्रास ‘‘वन’’ म्हणून घोषित करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर आदेशास अनुलक्षून विविध शासकीय यंत्रणांव्दारे वन विभागास एकूण २६८०९ हे. कांदळवन क्षेत्र हस्तांतरीत करण्यात आले आहे. त्याचा जिल्हानिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे-

| अ.क्र | जिल्हा | विविध यंत्रणांव्दारे हस्तांतरीत क्षेत्र |
|---|---|---|
| १. | मुंबई शहर | २९० हे. |
| २. | मुंबई उपनगर | ४३१३ हे. |
| ३. | ठाणे | ३५७९ हे. |
| ४. | पालघर | ४०९७ हे. |
| ५. | रायगड | ११०९६ हे. |
| ६. | रत्नागिरी | २८९९ हे. |
| ७. | सिंधुदूर्ग | ५३५ हे. |
| **एकूण** | | **२६८०९ हे** . |

वन विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्राच्या संरक्षण व संवर्धानासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत-

१. MRSAC २००५, IIST २०१८ व MRSAC २०२२ कडील High Resolutions नकाशाचा वापर क्षेत्रिय कामात करण्यात येत आहे.

२. कांदळवन संरक्षणाकरीता विभागीय आयुक्त यांचे स्तरावर तसेच अपर मुख् य सचिव (महसूल) यांच्या स्तरावरुन संनियंत्रण समिती कार्यरत आहेत.

३. कांदळवन तक्रारी निवारणाकरीता कांदळवन सुरक्षा ॲप सुरु करण्यात आले आहे.

४. कांदळवन क्षेत्रात अतिक्रमण होऊ नये यास्तव ९.४४ कि मी ची संरक्षण भिंत/ चेन्लिंग फेन्सिंगचे काम करण्यात आले.

५. कांदळवन क्षेत्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला असून काम प्रगतीपथावर आहे.

६. कांदळवनाचे लोकसहभागातून संरक्षण व संवर्धन करण्याकरीता २१८ सहव्यवस्थापन समित्या व ७५८ बचत गट कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर येथे सोयाबीन संशोधन केंद्र उभारण्याबाबत

**(४) ४८७७ (१४-१२-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात प्रतिवर्षी किमान १५ लाख टन सोयाबीनचे उत्पादन होत असून लातुर येथे सोयाबीन संशोधन केंद्राची उभारणी केल्यास, लातूर परिसरातील शेतकऱ्यांना चांगल्या प्रतिचे बियाणे व तंत्र मार्गदर्शन मिळण्यास मदत होऊन सोयाबीन वर प्रक्रिया करणारे उद्योग निर्माण होऊन स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार असल्याने तेथील शेतकऱ्यांनी सोयाबीन संशोधन केंद्राची उभारणी करण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातुर येथे सोयाबीन संशोधन केंद्र उभारणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१८-०२-२०२६) :** (१) होय,

(२) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत मौजे धर्मापुरी, ता.परळी वैजनाथ, जि.बीड येथे सोयाबीन संशोधन, प्रशिक्षण व प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या सोयाबीन संशोधन केंद्राचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण मराठवाड्यासाठी आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना देखील या केंद्राचा लाभ मिळणार असल्याने लातूर येथे सोयाबीन संशोधन केंद्र स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील प्रस्तावित सांबरकुड मध्यम प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना हेक्टरी दोन कोटी रुपयांची भरपाई देण्याबाबत

**(५) ४९६६ (१७-१२-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामराज, महाण (ता.अलिबाग जि.. रायगड) येथील परिसरात प्रस्तावित सांबरकुड मध्यम प्रकल्प दिनांक २८ सप्टेंबर, १९८२ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी भूसंपादन करताना अत्यल्प दर निश्चित करण्यात आला असल्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी त्यास तीव्र विरोध नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांनी आपल्या जमिनीच्या मोबदल्यात चालू बाजारभावानुसार हेक्टरी दोन कोटी रुपयांची भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती माहिती संकलित केली आहे व कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(४) अद्याप कोणतीही निर्णयप्रक्रिया सुरु नसेल, तर या प्रकरणात झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन (२७-०२-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सांबरकुंड मध्यम प्रकल्पास दिनांक २८ जुलै, १९८२ रोजी मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली असून, सद्य:स्थितीमध्ये भुसंपादन व पुनर्वसनाबाबतची कामे प्रगतीपथावर आहेत. मुख्य धरणाचे काम अद्याप चालु नाही.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रासाठी एकूण १५३.३ हेक्टर खाजगी जमीन संपादन आवश्यक असून त्यापैकी १०३.८१ हे. जमिनीचा अंतिम निवाडा दिनांक १७/०९/२०११ रोजी भुसंपादन कायदा १८९४ नुसार जाहीर झाला आहे. परंतु शेतकऱ्यांनी सदरची रक्कम ही जुन्या भूसंपादन अधिनियम १८९४ नुसार असल्याने संबंधित खातेदारांनी मोबदला रक्कम स्विकारण्यास तीव्र विरोध केला व २०१३ च्या नवीन भुसंपादन कायद्यानुसार मोबदला मिळण्याची मागणी केली आहे

(३) प्रकल्पग्रस्तांनी आपल्या जमिनीच्या मोबदल्यात चालु बाजारभावानुसार हेक्टरी दोन कोटी रुपयांची भरपाई मिळण्याची मागणी दिनांक ०४/१२/२०२३ च्या निवेदनाद्वारे सांबरकुंड प्रकल्पग्रस्त समितीमार्फत केली आहे.

मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (जलसंपदा) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १९/०७/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्देश प्राप्त आहेत.

"नवीन भुसंपादन कायद्याप्रमाणे एकूण देय रक्कमेची परिगणना उपविभागीय अधिकारी, महसूल यांनी करुन त्याप्रमाणे सानुग्रह अनुदान प्रस्ताव जलसंपदा विभागाने सादर करावा."

उपरोक्त निर्देशास अनुसरुन, कार्यकारी अभियंता, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्या कार्यालयाकडून रुपये ८२,२८,२४०/- प्रति हेक्टरी दरानुसार रुपये ८१,२९,६६,८१९/- इतक्या रक्कमेचा उर्वरित सानुग्रह अनुदान मंजुरीचा प्रस्ताव दिनांक ०३/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला असून, सदर प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रधान मंत्री किसान सन्मान योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(६) ५२६८ (१४-१२-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील ८०७६ शेतकऱ्यांचे ई-केवायसी,आधार सीडिंग झाले नसल्याने प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा लाभ मिळत नसल्याची बाब तालुकानिहाय सर्वेक्षणात दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उर्वरित शेतकऱ्यांचे ई-केवायसी,आधार सीडिंग करून घेवून लाभ देणे संदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दत्तात्रय भरणे (२६-०२-२०२६) :** (१) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत जळगाव जिल्ह्यातील एकूण ५,५३,५५८ शेतकऱ्यांनी पीएम किसान पोर्टलवर नोंदणी केली आहे. त्यापैकी ५,१५,३४२ शेतकऱ्यांना आतापर्यंत एकूण २१ हप्त्यांत एकंदरीत रुपये १७५५.७७ कोटी इतकी रक्कम

त्यांच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून जमा करण्यात आली आहे.
(२) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळण्यासाठी ई-केवायसी प्रमाणीकरण व बँक खाते आधार संलग्न करणे या बाबींची पूर्तता लाभार्थींनी करावयाची आहे.

केंद्र/राज्य शासनाच्या सूचनांनुसार उक्त बाबींची पूर्तता करण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय पातळीवरील कार्यालये व पोस्ट कार्यालये यांना निर्देश देण्यात आले आहेत. तसेच याकरीता गावपातळीवर वेळोवेळी जागरुकता मोहिमांचे आयोजन करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पिंपरी चिंचवड शहरातील मोशी येथे भारतीय व्यवस्थापन संस्थेची स्थापना करण्याबाबत

**(७) ५४६७ (१७-१२-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड शहरातील मोशी येथील ७० एकर जागेवर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट म्हणजेच भारतीय व्यवस्थापन संस्थेची (आयआयएम) स्थापना होणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे महाराष्ट्राची शैक्षणिक राजधानी असलेल्या पुण्याच्या स्थानिक विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होऊन या विभागातील बेरोजगारी मोठ्या प्रमाणात कमी होणार असल्याने मुंबई-पुणे कनेक्टिव्हिटी औद्योगिक विकास आणि शैक्षणिक वातावरण लक्षात घेता आयआयएम सारखी संस्था सुरू होणे हे शहरासाठी अभिमानास्पद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यासाठी महसूल विभागाने मान्यता दिली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ही संस्था कधीपर्यंत स्थापन करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२५-०२-२०२६) :** (१) होय, खरे आहे.

संचालक, भारतीय प्रबंध संस्था (आयआयएम) नागपूर यांनी दिनांक २५/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये आय आय एम संस्थेचे मोशी जि.पुणे येथे कॅम्पस सुरू करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) होय.
(४) याबाबत संस्थेकडे विचारणा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी योजनांसाठीची 'लकी ड्रॉ' पध्दती रद्द केल्याबाबत

**(८) ५५८८ (१४-१२-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने विविध कृषी योजनांचा लाभ देताना पूर्वी वापरली जाणारी 'लकी ड्रॉ' पध्दती रद्द करुन 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या लागू केलेल्या नव्या नियमामुळे सर्वप्रथम अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांना तात्काळ लाभ मिळून दुर्बल शेतकरी या प्रक्रियेत मागे राहत असल्याने सक्षम व साधनसंपन्न शेतकरी योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेत असून दुर्बल, गरीब व दूरवरच्या भागातील शेतकरी वंचित राहत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सर्व शेतकऱ्यांना समसमान संधी मिळावी यासाठी शासनाने अर्ज प्रक्रियेत पारदर्शकता व सुलभता ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (२१-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
महाडीबीटी पोर्टलवर विविध घटकांसाठी अर्ज करण्याची ऑनलाईन सुविधा २४ तास उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांची अर्जाच्या तारीख व वेळेनुसार तयार होणारी प्रतीक्षा यादी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच महा डीबीटी पोर्टलवर उपलब्ध करून दिली जाते. तसेच अर्ज करणारे सर्व शेतकरी प्रत्यक्ष लाभ घेतातच असे नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन उपलब्ध निधीच्या २ ते ३ पट लाभार्थींची निवड करण्याची सुविधा महा डीबीटी पोर्टलवर निर्माण करण्यात आली आहे. अशा प्रकारे निवड झालेल्या व प्रतीक्षा यादीतील शेतकऱ्यांची माहिती ऑनलाईन उपलब्ध असल्यामुळे अर्ज प्रक्रियेत पारदर्शकता व सुलभता आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील १०६ पाणथळ क्षेत्रावरील जमिनीचे सर्वेक्षण करण्याबाबत

**(९) ५८५२ (१४-१२-२०२५) श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील १०६ पाणथळ क्षेत्रावरील जमिनीचे सर्वेक्षण करुन सदर जमिनीवर पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून कामे घेतली जाणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पाणथळ क्षेत्रावरील जमिनींचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे काय तसेच त्याची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२५-०२-२०२६) :** (१) हिंगोली जिल्ह्यातील १०६ पाणथळ क्षेत्रावरील जमीनीचे सर्वेक्षण करण्याकरीता केंद शासनाने हिंगोली जिल्ह्याकरीता टिम पाठविली असून सदरच्या टिमची बैठक दिनांक ०८/१०/२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे झाली व सदरच्या टिमने अंदाजीत ८ दिवस हिंगोली जिल्ह्यातील पाणथळ स्थळाचे सर्वेक्षण केलेले आहे. सदर सर्वेक्षणाचा कोणताही अहवाल जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडुन अदयापपर्यंत देण्यात आलेला नाही.
(२) अहवाल अप्राप्त आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात इंधनाच्या दरवाढीमुळे फळे, भाजीपाला, डाळी इ.जीवनावश्यक वस्तुंच्या दरात वाढ होत असल्याबाबत

**(१०) ९०९८ (१३-०७-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात इंधनाच्या दरवाढीमुळे फळे, भाजीपाला, डाळी या जीवनावश्यक वस्तूंचे दर कमालीचे वाढले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इंधनाच्या वाढत्या किमतींमुळे महागाई वेगाने वाढत असून त्याचा परिणाम थेट शेती व मॅन्युफॅक्चरिंग व इतर अनेक क्षेत्रात होत असल्याचे निदर्शनाास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने इंधनवाढीची झळ सर्वसामान्य व गरीब जनतेला सोसावी लागू नये याकरीता रोजच्या वापरात असणाऱ्या फळे, भाजीपाला, डाळी या जीवनावश्यक वस्तूंचे दर नियंत्रणात रहाण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (२६-०२-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) जानेवारी २०२१ च्या तुलनेत जानेवारी २०२२ मध्ये मुंबई शहरात तांदूळ, गहू, तूर दाळ, पामतेल व साखर किंमतीमध्ये वाढ झालेली होती. परंतु पुणे शहरामध्ये तांदुळाच्या किंमतीमध्ये ९.५२ टक्के घट झाली आहे.

इंधनाचे दर यावर केंद्र शासनाचे नियंत्रण असते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये विज्ञान शिक्षकांची संख्या वाढविण्याबाबत

**(११) १४२८४ (२५-०८-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागाच्या आदेशानुसार राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये ४५ पटसंख्या असलेल्या वर्गासाठी विज्ञान व भाषा या विषयाचे दोन शिक्षक असणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्हा परिषदेच्या २ हजार ७९८ शाळांसह राज्यातील १ लाख ९ हजार शाळांमध्ये विज्ञान विषयाचे १३ हजार शिक्षक कमी आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विज्ञान विषयाच्या शिक्षकांची संख्या वाढवण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०९-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे
(२) व (३) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ च्या आधारे पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात मुलाखतीसह व मुलाखतीशिवाय अशी एकूण ३२,०१७ पदांची जाहीरात प्रसिध्द झाली. त्यानुसार

२३,८६६ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये खंड पडू नये यास्तव शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी-२०२५ घेण्यात आली असून, त्याचा निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार शिक्षक भरतीबाबतची पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यास्तव रिक्त शिक्षक पदे भरणेबाबत शासन प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सैनिकी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्येबाबत

**(१२) १६०१७ (२८-१२-२०२२) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक सैनिकी शाळा सुरू करण्याबाबत महत्त्वाचा निर्णय सन १९९६ रोजी घेण्यात आला परंतु २८ वर्षे होऊनही अद्याप या सैनिकी शाळांचा शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्या कायम आहेत, हे खरे आहे काय?
(२) असल्यास, राज्यातील सैनिकी शाळेतील शिक्षकांच्या कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध मंजूर नाही, आदिवासी तुकडीवरील शिक्षक पदांना मान्यता नाही, राज्यातील सैनिकी शाळा येथील फी वाढविण्याबाबत इत्यादी विषयावर कोणताही निर्णय नाही, हे ही खरे आहे काय ?
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून राज्यातील सैनिकी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?
(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२३-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २६ सप्टेंबर १९९५ रोजीच्या शासन निर्णयात व आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २४ डिसेंबर २००७ रोजीच्या शासन निर्णयात शिक्षक पदांबाबत सुस्पष्ट तरतुदी आहेत.
(३) व (४) दिनांक २६ सप्टेंबर १९९५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात सुरु करण्यात आलेल्या सैनिकी शाळांमधून N.D.A. (राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी) मध्ये अगदी अत्यल्प विद्यार्थी प्रवेशित असल्यामुळे सदर योजनेत सुधारणा करून शाळांच्या कामगिरीवर अधारीत अनुदान देण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मा.मंत्रीमंडळाने दिनांक ०५ मार्च २०२० रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिले होते.

राज्यातील सैनिकी शाळांसाठी दिनांक ०९ ऑक्टोबर २०२४ रोजी सुधारित धोरण निश्चित करण्यात आले. मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील दिनांक १४/०५/२०२५ रोजी पार पडलेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार सुधारित धोरणातील तरतुदींचा विचार करून राज्यातील सैनिकी शाळांसाठी सुधारित मसुदा तयार करण्यासाठी व आवश्यक सूचना करण्यासाठी दिनांक २३ जून २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समिती गठीत करण्यात आली आहे.

---

**जामनेर (जि.जळगाव) येथे न्यू इंग्लिश स्कूल मधील बेकायदेशीर शिक्षक भरती तक्रारीबाबत**

**(१३) १६१६३ (२८-१२-२०२२) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामनेर (जि.जळगाव) येथे न्यू इंग्लिश स्कूल मधील बेकायदेशीर शिक्षक भरती प्रकरणी श्री.पारस झुम्बरलाल ललवाणी यांनी दिनांक १५ जून,२०२० रोजी वा त्यासुमारास तक्रार केलेली असून त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१३-०१-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

जामनेर (जि.जळगांव) येथील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये बेकायदेशीर शिक्षक भरतीबाबत श्री.पारस ललवाणी यांनी जामनेर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली आहे. परंतु याबाबत जामनेर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला नाही. मात्र याबाबत पोलीस निरीक्षक, जामनेर पोलीस स्टेशन यांनी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांना आपल्या स्तरावरुन कार्यवाही करणेबाबत पत्र दिले आहे. त्यानुसार शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मुली शिक्षणाच्या प्रवाहातून दूर जात असल्याबाबत**

**(१४) २१०५० (०५-०१-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १९८५७ ला दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बालविवाह, कुटुंबांचे स्थलांतर, शासकीय शाळांमधील शैक्षणिक सुविधांचा अभाव, अनेक शाळांमध्ये मुलींसाठी प्रसाधनगृहांचा अभाव, तसेच माध्यमिक शाळांमध्ये मुलींच्या मोफत शिक्षणाबाबत योग्य अंमलबजावणी न होणे अशा अनेक कारणांमुळे पहिलीच्या वर्गात दाखल झालेल्या १ कोटी ३ लाख ८२ हजार ५७० मुलींपैकी, बारावीपर्यंत केवळ २० लाख ५४ हजार २५२ मुली शिक्षण घेत असून उर्वरित ८३ लाख २८ हजार ३१८ मुली शिक्षणापासून वंचित राहिले असल्याचे दिनांक १६ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने मुलींना शिक्षण प्रवाहाकडे आकृष्ट करणे ही शासनाची जबाबदारी असूनही मुलींची होणारी शैक्षणिक गळती थांबविण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२१-०१-२०२६) :** (१) हे, अंशत: खरे आहे.

(२) विविध कारणाने शाळाबाह्य होणाऱ्या मुलांसाठी शासनामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येते.

शाळाबाह्य बालकांना नियमित शाळेत वयानुरूप दाखल करून त्यांची उपस्थिती टिकवून सदर मुलांना वयानुरूप वर्गासाठी संपादणूक पातळी गाठण्यासाठी नियमित शिक्षकांद्वारे शाळेतच विशेष प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येते.

स्थलांतरित होणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मूळ ठिकाणी थांबविण्यासाठी समग्र शिक्षा अंतर्गत हंगामी अनिवासी वसतिगृह ही योजना ६महिने (माहे ऑक्टोबर ते मार्च) कालावधीकरीता राबविण्यात येते. शाळा व्यवस्थापन समितीमार्फत सदर उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येते. याकरीता प्रति मूल रुपये १०,०००/- प्रमाणे केंद्रशासनाकडून तरतूद प्रतिवर्षी मंजूर करण्यात येते.

-समग्र शिक्षा अंतर्गत दुर्गम भागातील शाळाबाह्य तसेच अनाथ मुलांकरीता निवासी शाळा / वसतिगृह नेताजी सुभाषचंद्र बोस अवासिय विद्यालय / वसतिगृह या उपक्रमा अंतर्गत सुरु आहेत.तसेच विशेष दुर्लक्षित १० जिल्ह्यातील ४३ तालुक्यांमध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्या लय निवासी / शाळा सुरु आहेत.

युडायस प्लस अंतर्गत Permanent Education Number (PEN) देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. ज्यामुळे गळती (ड्रॉपआऊट) झालेले मूलं Track होण्यास मदत होत आहे.

भारत सरकारने प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM JANMAN) अंतर्गत २५ व धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DA JGUA) या योजनेंतर्गत २२ अशा एकूण ४७ वसतिगृहांना मंजूरी दिलेली असून याद्वारे ४,७०० विद्यार्थ्यांना वसतिगृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे लेखाशीर्ष वेतन नियमित करणेबाबत

**(१५) २१०५८ (०५-०१-२०२४) श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंशत अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे लेखाशीर्ष (५११, ३३६१, ३३७९, ३२६१) वेतन नियमित होत नसल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२३ रोजीच्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंशत अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे लेखाशीर्ष (५११, ३३६१, ३३७९, ३२६१) वेतन नियमित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१९-१२-२०२५) :** (१) व (२) दिनांक १३ डिसेंबर, २०२२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार शालेय शिक्षण विभागामार्फत दिनांक ०६/०२/२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता.सदर शासन निर्णयात “कायम” विना अनुदान तत्वावर मान्यता

दिलेल्या व "कायम" शब्द वगळलेल्या (इंग्रजी माध्यम व्यतिरिक्त) त्रुटीपूर्तता केलेल्या शाळांना अनुदान मंजूर करणे, यापूर्वी अंशत: अनुदान घेत असलेल्या शाळा तुकड्यांना वाढीव अनुदानाचा टप्पा व अघोषित असलेल्या खाजगी प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये / वर्ग / तुकड्यांना अनुदानास पात्र घोषित करण्यात आले आहे. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प वित्त विभागास सादर करतांना उपरोक्त बाबीसाठी आवश्यक निधीची मागणी करण्यात आली नव्हती.

सदर लेखाशीर्षाकरीता वेतनासाठी आवश्यक असणारी अतिरिक्त तरतूद हिवाळी अधिवेशन, २०२३ मध्ये पुरक मागणीद्वारे उपलब्ध करुन घेण्यात आली.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सदर लेखाशीर्षाखालील वेतन नियमित सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात चंद्रपूर येथील थायसेन इंडस्ट्रीज इंडिया कंपनी व औष्णिक विद्युत केंद्र आणि महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मधील कंत्राटी कामगारांना कामावर घेण्याबाबत

**(१६) २१५९१ (०५-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील थायसेन इंडस्ट्रीज इंडिया कंपनी व औष्णिक विद्युत केंद्र चंद्रपूर आणि महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक कंत्राटी कामगार व सहाय्यक कामगार यांच्या सोबत झालेल्या बैठकीत कंत्राटी कामगारांना कामावर घेण्यात येणार असल्याची माहिती वीज केंद्राने दिली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कामगारांना कामावर घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) चंद्रपूर येथिल थायसेन इंडस्ट्रिज इंडिया कंपनी व औष्णिक विद्युत केंद्र चंद्रपूर आणि महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक कंत्राटी कामगार यांना कंत्राटदारामार्फत पूर्ववत कामावर घेण्यासंदर्भात सहायक कामगार आयुक्त, चंद्रपूर व चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र प्रशासन समवेत संबंधित कंत्राटी कामगार संघटनेची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत कनव्हेअर बेल्ट चा नवीन कंत्राट झाल्यास सदर कंत्राटी कामगारांना कंत्राटदारामार्फत पुर्ववत कामावर घेण्यात येईल असे सांगण्यात आले. त्यानुसार दिनांक ०१/१०/२०२३ पासून कंत्राटी कामगारांना पूर्ववत कामावर घेण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यपातळीवर जातीनिहाय सर्व्हेक्षण करण्याबाबत

**(१७) २२१६८ (०५-०१-२०२४) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १७३०९ ला दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिहार राज्यशासनाने केलेल्या पहिल्या जातीनिहाय सर्वेक्षणांची आकडेवारी नुकतीच प्रसिध्द करण्यात आली असून त्याद्वारे जातीची माहिती व आर्थिक स्थितीही जाणून घेण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिहारप्रमाणे महाराष्ट्रातही ईबीसी, ओबीसी, अनुसूचित जाती, अनूसूचित जमाती, खुल्या वर्ग, अल्पसंख्याक इत्यादी समाजातील नागरिकांचाही समावेश करुन राज्यपातळीवर जातीनिहाय सर्वेक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (२६-०२-२०२६) :** (१) ते (३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी सन २०२१ च्या सार्वत्रिक जनगणनेमध्ये मागास प्रवर्गातील लोकसंख्येची जातीनिहाय जनगणना करण्याची शिफारस या विषयाबाबत मांडलेला ठराव दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी सभागृहात चर्चा होऊन एकमताने संमत करण्यात आला. सभागृहाने संमत केलेला ठराव पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी दिनांक १० फेब्रुवारी, २०२० च्या पत्रान्वये सहसंचालक, महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त कार्यालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना पाठविण्यात आला आहे. तसेच, दिनांक २७ एप्रिल, २०२२ रोजीच्या स्मरणपत्रान्वये याबाबत केलेली कार्यवाही महाराष्ट्र शासनास कळविण्याबाबत पुन्हा विनंती करण्यात आलेली आहे. तथापि, दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी मा.पंतप्रधान यांच्या अध्यक्षतेखालील राजकीय व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने जातींची गणना स्वतंत्र सर्वेक्षण म्हणून न करता आगामी सार्वत्रिक जनगणनेत जातीय गणना समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. संचालक, महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त कार्यालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे कार्यालयाकडून सार्वत्रिक जनगणनेसोबत करावयाच्या जातनिहाय जनगणनेबाबत निर्देश प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून पार पाडली जाईल.

---

## शालेय शिक्षण विभागात अनुदानित शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरणे तसेच विविध कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) २२३५६ (०५-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाच्या अनुदानित शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरणे तसेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाकडे शिक्षकांची बदली, शाळा तपासणी, नवीन शिक्षकांच्या वेतनास मंजूरी आरोग्याशी संबंधित देयकांना मंजूरी, निवृत्ती वेतन अशा कामांसाठी लाच मागणारे अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून लाखो रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट,२०२३ वा त्यासुमारास

निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षक भरतीवर माहे मे, २०१२ मध्ये बंदी असतानाही शिक्षणाधिकारी, संचालक व उप संचालकांनी लाखो रुपये घेऊन सुमारे ७ हजार शिक्षकांच्या नियुक्त्या केल्या असल्याने ५९ शिक्षणाधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या असून सुमारे १ लाख १० हजार शासकीय अनुदानित व खाजगी सीबीएसई शाळा असल्याने आर्थिक गैरव्यवहार व अनियमितेबाबत शालेय शिक्षण विभागात भ्रष्टाचाराचे छुपे दरपत्रक तयार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण विभागातील गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांची सक्त वसुली संचालनालयामार्फत (ईडी) चौकशीची घोषणा मा.उपमुख्यमंत्री यांनी केल्याने गैरव्यवहार करणारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना 'ईडी' च्या चौकशीला सामोरे जावे लागत असल्याचे यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शाळांमधील विविध कामांसाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून लाच मागून आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे,

आयुक्त (शिक्षण), पुणे यांचे कार्यालयाकडून सन २०१२ ते २०१५ या कालावधीमध्ये प्रथमदर्शनी निकषानुसार नसलेल्या मान्यतांच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. सदर मान्यतांची एकस्तर वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत सुनावणी घेण्यात आली. त्यानुसार सुनावणीअंती अंतिम निष्कर्षानुसार नियमबाह्यरित्या प्रदान केलेल्या मान्यतांप्रकरणी संबंधित दोषी अधिकारी / कर्मचारी यांच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.
(३) हे अंशत: खरे आहे,

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून तत्का. प्रशासन अधिकारी, महानगरपालिका, नाशिक यांच्याविरूध्द दिनांक ०३/०६/२०२३ रोजी सापळा कारवाई करण्यात आली होती. सदर कारवाईच्या अनुषंगाने तत्का. मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात याप्रकरणी सक्त वसुली संचालनालय (ईडी) मार्फत चौकशी केली जाईल, याबाबतची घोषणा केली होती.
(४) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून शिक्षण विभागातंर्गत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध कामांसाठी लाच मागणाऱ्या अधिकारी /कर्मचारी यांच्याविरूध्द वेळोवेळी सापळा कारवाई करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द शासन स्तरावरून निलंबनाची व शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तसेच, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेली सापळा कारवाई विचारात घेता, संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची खुली / उघड चौकशी करण्याबाबत आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी लाचलुचपत विभागास विविध पत्रांद्वारे वेळोवेळी कळविले आहे. त्यानुषंगाने दोन शिक्षणाधिकारी यांच्याविरुध्द उघड चौकशीअंती अपसंपदेचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात घरफोडी, लुटमारीचा तपास करताना १६ मार्गदर्शक सूचनांचे परिपत्रक जारी केल्याबाबत

**(१९) २४००४ (२२-०७-२०२४) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात होत असलेल्या घरफोडी, लुटमारीसंदर्भात तपास करताना सराफ व्यावसायिकांना चौकशीसाठी पोलीस पथकाने तसेच तपास अधिकाऱ्यांने जबरदस्ती न करता दुकानातच त्याचा जबाब नोंदवावा तसेच कर्तव्यावरील पोलिसांनीच कारवाईत सहभागी व्हावे व पुरेसे पुरावे असल्यावरच अटक करावी असे स्पष्ट आदेश गृह विभागाने पोलिसांना दिले असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने १६ मार्गदर्शक सूचनांचे परिपत्रक जारी केले असून सदर आदेशाचे पालन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी आदेशाचे पालन करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे आहे,

राज्यातील सराफ व्यावसायिकांकडून चोरीची/ संशयित मालमत्ता जप्त करताना तपासी अधिकाऱ्यांनी पाळावयाची मार्गदर्शक तत्वे तसेच सराफांच्या अडचणी सोडविण्यासाठी, निर्दोष सराफ व्यापाऱ्यांना नाहक त्रास होवू नये तसेच आरोपीलाच शिक्षा व्हावी या दृष्टीकोनातून मार्गदर्शक तत्वांची प्रभावी अंमलबजावणी / काटेकोरपणे पालन करण्यासाठी तसेच राज्यातील सराफांच्या सुरक्षा विषयक समस्यांचे निराकरण करण्याबाबत दिनांक १४/०३/२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांना सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अध्ययन अक्षम असलेल्या विद्यार्थ्यांना सुविधा पुरविण्याबाबत

**(२०) २४४५३ (२५-०२-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अध्ययन अक्षम असलेल्या विद्यार्थ्यांना मानसशास्त्रीय चाचणी घेऊन प्रमाणपत्र देण्याची सुविधा उपलब्ध असून अशा प्रमाणित अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेच्या वेळी आणि मूल्यमापनामध्ये सवलती देण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्दू माध्यमाच्या शाळांतील अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांची मानसशास्त्रीय चाचणी घेण्याचे साधन उपलब्ध नसल्यामुळे असे हजारोअध्ययन अक्षम असलेले विद्यार्थी अध्ययन-मूल्यमापन सवलती पासून वंचित राहतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उर्दू माध्यमातील अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांना प्रमाणित करण्याबाबत अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांची मानसशास्त्रीय चाचणी घेण्याचे साधन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१६-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) समग्र शिक्षा समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण विशेष शिक्षकांमार्फत करण्यात येते तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम उपक्रमांतर्गत तपासणी केल्यानंतर संदर्भित करण्यात आलेल्या अध्ययन अक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांची संशयित अध्ययन अक्षम विद्यार्थी म्हणून यु-डायस प्रणालीमध्ये नोंद घेण्यात येते. त्यानंतर सदर संशयित अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांची त्या त्या जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयांमार्फत किंवा जे जे रुग्णालय/नायर रुग्णालय/केईएम रुग्णालय/सायन रुग्णालय/ससून रुग्णालय या रुग्णालयांमार्फत तपासणी करण्यात येऊन प्रत्यक्ष अध्ययन अक्षम आढळून आलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्यामार्फत UDID प्रमाणपत्र देण्यात येते व त्यानुसार दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैलीनुसार मूल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलती संदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार विशेष शिक्षकांच्या माध्यमातून अशा अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांना सेवा व सुविधांचा लाभ देण्यात येतो. तसेच विशेष शिक्षकांमार्फत प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनामध्ये आढळून येणाऱ्या अक्षमतेनुसार अध्ययन-अध्यापन प्रक्रियांबाबत नियोजन करून कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.